| | |
|---|---|
| MHKO050012092012 | **नियमित दिवाणी दावा क्र.५६६/२०१२,**<br>**निशाणी क्र.५५ वरील आदेश**<br>**संजय धोंडीराम साळुंखे विरुध्द सरस्वती भुपाल कट्टी** |

वादीतर्फे प्रस्तुत अर्ज प्रकरणात भारतीय साक्ष अधिनिमय कलम ६५-अ प्रमाणे डिमांड ड्राफ्टबाबत दुय्यम पुरावा करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे की, वादी यांनी प्रतिवादीविरूध्द करारपत्राप्रमाणे खरेदीपत्र पूर्ण होऊन मिळणेसाठी सदरचा दावा दाखल केला आहे. तसेच वादीचा उलटतपास पूर्ण झालेला आहे. प्रतिवादी यांनी करारपत्रात ठरले अटी व शर्तीप्रमाणे ऑगस्ट २०२१ मध्ये इचलकरंजी येथे दावा मिळकतीचे खरेदीपत्र पूर्ण करून देत असलेचे सांगितले. त्याप्रमाणे वादी यांनी खरेदीपत्राकरीता स्टॅम्प व डिमांड ड्राफ्ट काढून ठेवून तशी प्रतिवादी यांना माहिती माहिती दिलेचे दावा अर्जी कलम ५ मध्ये केलेले आहे. तसेच वादी यांनी त्याअनुषंगाने नुतन नागरी सहकारी बँक लि., इचलकरंजी येथील काढलेले डिमांड ड्राफ्ट नि. २४ सोबत हजर केलेचे कथन केले आहे. वादी यांनी नि. ५१ नुसार नुतन नागरी सहकारी बँक लि., इचलकरंजी येथील सन २०११ सालातील रेकॉर्ड घेवून साक्षीसमन्स काढले असता साक्षीदाराने सदर बँक ही अवसायानामध्ये गेली असलेने सदरचे कागदपत्रे हजर करणेस असमर्थता दर्शविली. त्याकारणाने नि. २४ सोबत हजर केलेल्या डिमांड ड्राफ्टच्या झेरॉक्स प्रती सदर्भात दुय्यम पुरावा करणे खेरीज अन्य पर्याय उपलब्ध नसलेने सदरचा अर्ज मे. कोर्ट मजकुरी दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्जाला प्रतिवादीतर्फे **नि. ५६** नुसार म्हणणे देण्यात आले की, प्रस्तूतचा अर्ज, वादीचे नि. ५५ वरील कलम २ ते ४ मधील संपूर्ण मजकूर हा साधणी व अभिलाष बद्धीचा असलेचे, खरा नसलेने तो प्रतिवादी यांना कोणत्याही प्रकारे मान्य वा कबूल नसलेचे कथन केले आहे. तसेच प्रतिवादीने त्यांच्या कैफियतमध्ये तथाकथीत डिमांड ड्राफ्ट व दि. ११/१०/२०१० इ।। रोजीच्या तथाकथीत खरेदीपूर्व कराराचाही स्पष्ट शब्दात इन्कार केलेलो आहे. भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम ५६,५७,५८,५९ आणि ६० कायद्यातील तरतुदीप्रमाणे विचार होणे आवश्यक आहे. वादी तथाकथीत डिमांड ड्राफ्ट बाबत दुय्यम पुरावा करणेसाठी भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम ५८ मध्ये बसत नाही. त्यामुळे वादीस दुय्यम पुरावा करणेबाबतचा परवानगी देता येणार नाही. तथापी, सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादी विरुध्द करारपत्राप्रमाणे खरेदीपत्र पूर्ण होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीने प्रस्तूत अर्जाद्वारे कथन केले आहे की, प्रतिवादीने ऑगस्ट २०२१ मध्ये वादीला कराराप्रमाणे खरेदीपत्र पूर्ण करून देतो असे सांगितले होते, त्यामुळे वादीने दि. ०५/०८/२०११ इ।। रोजी **नि. २४** सोबत दाखल डिमांड ड्राफ्ट क्र. ८२७३३२ ते ८२७३३४ प्रमाणे डिमांड ड्राफ्ट काढून ठेवले होते, तसा मजकूर वादीने दाव्यात कलम ५ मध्ये देखील नमूद केला आहे, सदर डिमांड ड्राफ्ट न्यायालयासमोर सिध्द करणेकरीता **नि. ५१** प्रमाणे साक्षीदार सदर डिमांड ड्राफ्ट ज्या बॅकेतून काढले होते त्यांचा तपासणेकरीता न्यायालयाने अर्ज मंजूर केला होता, परंतू सदर बॅक अवसायानामध्ये गेली असलेने कागदपत्रे सन २०११ सालची असलेने सदर डिमांड ड्राफ्ट बाबत कागदपत्रे हजर करणेस असमर्थता दाखविली म्हणून डिमांड ड्राफ्टबाबत दुय्यम पुरावा मागितला आहे. वादीने नमूद केलेली सदर डिमांड ड्राफ्टबाबत त्यांच्या झेरॉक्स प्रती दाव्यात **नि. २४** सोबत दि. ०५/०९/२०१५ इ।। रोजी दाखल करणेत आले आहेत. **नि. ५१** प्रमाणे सदर बॅंकेच्या साक्षीदाराला समन्स काढले असता त्याने सदर कागदपत्रे बॅंकेकडे उपलब्ध नसलेचे **नि. ५३** वरील पत्राप्रमाणे कळविले आहे. सदर **नि. ५३** मधील पत्रामध्ये सदर बॅंकेने सदर बॅक सध्या अवसायानात गेली आहे, वादी व प्रतिवादी सदर बॅंकेचे सदर बॅकेचे खातेदार नसलेने सन २०१६ मध्ये बॅंकेच्या नुतनीकरणामध्ये सॉफ्टवेअर बदल केला आहे व त्यामुळे वादी प्रतिवादी यांच्या व्यवहाराबाबत माहिती मिळत नाही असे नमूद केले आहे. तसेच **नि. ५३** वरील सदर पत्रामध्ये वादीने मागणी केलेली कागदपत्रे सन २०११ ची असलेमुळे ती बॅंक दप्तरी मिळून येत नाहीत असे देखील नमूद केले आहे. सदर पत्रात सदर बॅंक सदर कागदपत्रे हजर करणेस त्यांना अडचण असलेचे नमूद केली आहे. सदर **नि. ५३** वरील पत्रावरून वादीने नमूद केलेले वरील तीन डिमांड ड्राफ्टबाबत सदर बॅंक प्राथमिक पुरावा देणेस असमर्थ आहे असे स्पष्ट होत आहे.

५. प्रतिवादी यांनी प्रस्तूत अर्जाला आक्षेप घेताना डिमांड ड्राफ्टबाबतचा मजकूर व तथाकथीत वादीने नमूद केलेला करारदेखील नाकारलेचे कथन करून भारतीय साक्ष अधिनियम कलम ५६,५७,५८,५९ व ६० चा विचार होणे आवश्यक आहे, वादीने मागणी केलेले डिमांड ड्राफ्ट कलम ५८ मध्ये बसत नसलेने प्रस्तूत अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे. वर नमूद केलेप्रमाणे सदर बॅंकेकडे डिमांड ड्राफ्टबाबत कोणताही प्राथमिक कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसलेचे **नि. ५३** वरील बॅंकेच्या पत्रावरून स्पष्ट होते. भारतीय साक्ष अधिनियम कलम ५६ हा पुराव्याच्या तत्वाचे मार्गदर्शन करताना असे सांगतो की, कोणताही कागद हा प्राथमिक अथवा दुय्यम

पुराव्याने सिध्द करावा. कलम ५७ हे कोणत्या प्रकारचा कागद हा प्राथमिक पुरावा होईल याबाबत मार्गदर्शन करतो. कलम ५८ कोणत्या प्रकारचे कागद हे दुय्यम पुरावा होतील याबाबत मार्गदर्शन करतो. कलम ५९ पुरावा कायद्याचे प्राथमिक तत्व नमूद करून कोणताही कागद प्राथमिक पुराव्याने सिध्द करावा असे नमूद करून दुय्यम पुराव्याने कोणती कागदपत्रे सिध्द करता येतील हे पाहणेसाठी कलम ६० तपासावे असे नमूद करतो.

६. प्रतिवादी यांनी कलम ५८ मध्ये डिमांड ड्राफ्टच्या झेरॉक्स प्रती येत नसलेने सदर डिमांड ड्राफ्ट कलम ५८ मध्ये बसणार नाहीत, म्हणून त्याबाबत दुय्यम पुरावा करता येणार नाही असे नमूद केले आहे. कलम ५८ मध्ये दुय्यम पुराव्याबाबत मार्गदर्शन करताना प्रथम प्रमाणित प्रती नमूद केल्या आहेत. प्रस्तूत प्रकरणात डिमांड ड्राफ्टच्या प्रमाणित प्रती नाहीत. सदर कलमात द्वितीय दुय्यम पुराव्याबाबत मार्गदर्शन करताना असे नमूद केले आहे की, कोणत्याही मेकॅनिकल प्रक्रियेद्वारे मुळ कागदापासून दुय्यम कागद तयार केला असलेस, ज्याद्वारे त्याची अचुकता दाखवित असतील व ज्या मुळ कागदाशी तुलना केल्या असतील अश्या कागदांना दुय्यम कागद म्हणून सिध्द करता येईल. तसेच अन्य दुय्यम पुरावे कलम ५८ मध्ये नमूद करणेत आले आहेत. प्रस्तूत प्रकरणात मुळ डिमांड ड्राफ्ट ज्या बँकेने काढले त्या बँकेकडे ते उपलब्ध नाहीत असे **नि. ५३** वरील पत्राद्वारे स्पष्ट होते. भारतीय साक्ष अधिनियम कलम ६० मध्ये कोणत्या परिस्थितीत दुय्यम पुरावा देता येईल याबाबत मार्गदर्शन करणेत आले आहे. त्यापैकी सह कलम अ पैकी सह कलम ३ मध्ये जर एखादा माणूस कायद्याने तसा कागद हजर करणेस बांधील आहे व त्याला कलम ६४ प्रमाणे नोटीस देवून देखील तो सदर कागद हजर करत नसलेस त्याबाबत कलम ६० प्रमाणे पक्षकार दुय्यम पुरावा देवू शकतो. माझ्यामते प्रस्तूत प्रकरणात सदर बँकेला न्यायालयाचे डिमांड ड्राफ्टबाबत साक्षसमन्स पाठवणेत आले होते. ते त्यांना प्राप्त झाले व त्यांनी नि. ५३ प्रमाणे सदर पुरावा हजर करू शकत नाहीत असे नमूद केले आहे. त्यामुळे सदर न्यायालयाची साक्ष एकाप्रकारे सदर बँकेला नोटीस प्रमाणे आहे व सदर बँक डिमांड ड्राफ्ट देवू शकत नसलेने वादीला अभिलेखावर उपलब्ध **नि. २४** सोबत दाखल डिमांड ड्राफ्टच्या झेरॉक्स प्रती यांना दुय्यम पुरावा देणेची संधी देणे कायद्याने आवश्यक दिसते कारण सदर बँक त्याबाबत मुळ कागदपत्रे न्यायालयात दाखल करू शकत नाही.

७. प्रतिवादीतर्फे घेण्यात आलेला आक्षेप की, सदर डिमांड ड्राफ्ट कलम ५८ मध्ये बसत नाहीत. परंतू डिमांड ड्राफ्टच्या सदर झेरॉक्स प्रती **नि. २४** सोबत आहेत. जर सदर मुळ

डिमांड ड्राफ्ट बँकेकडे उपलब्ध असते तर त्याचे झेरॉक्स करून प्रमाणित करून बँकेने न्यायालयासमोर हजर केले असते त्याचा अर्थ ते झेरॉक्सच्या मेकॅनिकल किंवा तांत्रिक प्रक्रियेद्वारे झेरॉक्स करून प्रमाणित करून न्यायालयात हजर करता आले असते व ते न्यायालय कलम ५८ प्रमाणे स्वीकारू शकले असते. परंतू प्रस्तूत प्रकरणात मुळ डिमांड ड्राफ्ट उपलब्ध नसलेने त्याचे झेरॉक्स नाकारणे किंवा त्याबाबत दुय्यम पुरावा देणेस वादीला परवानगी न देणे वादीच्या हक्कावर गदा आणणे सारखे होईल. याउलट सदर डिमांड ड्राफ्टच्या झेरॉक्स प्रतीला दुय्यम पुरावा देणेबाबत संधी दिलेने प्रकरण गुणदोषांवर निकाली काढणे योग्य दिसते. वादीतर्फे दाखल मा. उच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय देखील असे सांगतो की, ज्या व्यक्तीने मुळ कागद हजर करणे गरजेचे व तो हजर करत नसलेस त्याबाबत दुय्यम पुरावा देता येवू शकतो असे नमूद केले आहे. सदर न्यायनिर्णयात खरेदीपूर्व करारपत्र वादाचा मुद्दा होता व प्रस्तूत प्रकरणात डिमांड ड्राफ्टबाबत दुय्यम पुराव्याचा वादविषय या अर्जात आहे. डिमांड ड्राफ्ट हे बँकेने तयार केलेले कागद असून प्राथमिकता त्याच्या झेरॉक्स प्रतीवर शंका घेणेच कारण नाही. तसेच सदर बँकेकडे मुळ डिमांड ड्राफ्ट उपलब्ध नाहीत. तसे पत्र देखील **नि. ५३** वर न्यायालयासमोर आहे. त्यामुळे सदर बँकेच्या या अगोदर बोलवणेत आलेल्या साक्षीदाराला परत बोलावून त्याच्याद्वारे सदर मुळ डिमांड ड्राफ्ट उपलब्ध नाहीत व सदर झेरॉक्स डिमांड ड्राफ्ट दाखवून त्याबाबत दुय्यम पुरावा देणेची वादीला संधी देणे न्यायाचे दिसते. त्याबाबत आवश्यक भुमिका मांडणेसाठी प्रतिवादीला सदर साक्षीदाराचा उलटतपास नोंदविणेची संधी देणे गरजेचे दिसते. सबब, पुढील आदेश:-

## आ दे श

**१.** सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** नमूद डिमांड ड्राफ्टच्या बँकेच्या साक्षीदाराला परत साक्ष देणेसाठी बोलावून मुळ डिमांड ड्राफ्ट उपलब्ध नाहीत असे अभिलेखावर आले नंतर जर सदर साक्षीदाराने **नि. २४** सोबत दाखल तीन डिमांड ड्राफ्ट त्यांच्या बँकेचे आहेत असे ओळखलेस त्याबाबत दुय्यम पुरावा देणेची संधी वादीला याद्वारे देणेत येते. प्रतिवादीला सदर साक्षीदाराचा उलटतपास नोंदविणेची संधी आहे.

PATWE DATARAJ GUNAJIRAO
Digitally signed by PATWE DATARAJ GUNAJIRAO
Date: 2025.03.05 17:59:43 +0530

दि.०५/०३/२०२५.

(डॉ. डी.जी.पटवे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इचलकरंजी.